महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११/२५२५२०
Email ID : rdc.palghar-mh@gov.in

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
४) या कार्यालयाचा आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/को.वि./पेट्रोल/डिझेल वितरण आदेश/कावि-४७४/२० दि.०८/०४/२०२०
५) भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२०-DM-१(A) दि.१४/०४/२०२०
६) महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्रमांक DMU/२०२०/ CR.९२/DisM-१ दि.१३/०४/२०२० व दि.१५/०४/२०२०.
७) महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्रमांक DMU/२०२०/ CR.९२/DisM-१/दि.१७/०४/२०२०, २१/०४/२०२०, २३/०४/२०२० व २४/०४/२०२०.
८) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२०-DM-I(A) दि.०१/०५/२०२०
९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०२/०५/२०२० व ०३/०५/२०२०.

---

क्र.जि.आ.व्य.पालघर/को.वि./पेट्रोल-डिझेल वितरण आदेश/रद्द/कावि- १०५०/२० दि.०४/०५/२०२०

---

## आदेश

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्या अर्थी, करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.८ व ९ अन्वये केंद्र शासनाने व राज्य शासनाने राज्यामध्ये लॉकडाऊन दि.१७/०५/२०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.७ मधील मार्गदर्शकतत्वान्वये शासनाने सार्वजनिक उपयोगिता करीता पेट्रोल, डिझेल, केरोसीन, सीएनजी, एलपीजी, पीएनजी या इंधन आणि गॅस क्षेत्रातील कामे जसे की, रिफायनिंग, वाहतूक, वितरण, साठवणूक आणि विक्री सुरु राहील असे निर्देश आहेत. तसेच जिल्हयातील अत्यावश्यक वस्तूंची उत्पादने करणाऱ्या कंपन्या सुरु आहेत. तसेच काही सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील कामे सुरु झालेली आहेत. शेतीची कामे, देखभाल-दुरुस्तीची कामे इ. मान्सूनपूर्व कामे करणेकामी निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे या कार्यालयाने उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये पारीत केलेला आदेश रद्द करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये उपोद्घातातील अ.क्र.४ नुसार पालघर जिल्हयाच्या हद्दीतील सर्व पेट्रोल-डिझेल पंप धारक यांना पेट्रोल-डिझेल विक्री करणेस मनाई करण्यात आलेला आदेश **रद्द** करीत आहे.

सदरचा आदेश आज दि.०४/०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) सर्व संबंधित.
२) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
५) जिल्हा पुरवठा अधिकारी पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर

**जिल्हादंडाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**